# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 24/06/2020 (बुधवार)
(सायंकाळ)

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कोंढाळी :–अंतर्गत 7 कि. मी.अंतरावर मौजा स्वाद आनंद रेस्टॉरेन्ट जुनापानी येथे दिनांक 23/06/2020 चे 19.00 वा. ते 19.45 वा. दरम्यान आरोपी नामे– जयंत सुदर्शन डोंगरे, वय 27 वर्ष, रा. जुनापानी याच्या स्वाद आनंद रेस्टॉरेटचे कॅश काउंटरमध्ये एक लोखंडी तलवार धारदार टोकासह कि. 1,000/– रू. ची विनापरवाना आरोपीचे ताब्यातून मिळून आली.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक कानिफनाथ जाधव, पोस्टे. कोंढाळी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कोंढाळी येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिलीप इंगळे 9011119522 हे करीत आहेत.

### अकस्मात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि. मी. अंतरावर गुमथळा येथे दिनांक 09/06/2020 चे 14.00 वा. दरम्यान कु. काजल ताराचंद बसशंकर, वय 21 वर्ष, रा. गुमथळा हिने अज्ञात कारणातुन विषारी औषध प्राशन केले. तिची प्रकृती खराब झाल्याने उपचाराकरीता प्रथम पीएचसी गुमथळा येथे नेले व नंतर मेडीकल कॉलेज, नागपूर येथे भरती केले असता दि. 11/06/2020 चे 02:30 वा. तिचा मृत्यू झाला. संबधीत कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार राजेश माकडे, मेडीकल बुथ, नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस शिपाई मनोज लांजेवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर